Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 04 November 2026

Time 18.10 to 18.20

Language Marathi

आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

प्रादेशिक बातम्या

दिनांक – ०४ नोव्हेंबर २०२६ सायंकाळी ६.१०

****

- दुष्काळग्रस्त भागातील ७३ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ५ हजार रुपये अग्रिम मदत जमा;कर्जमाफी योजनेचा आज चार लाख ८६ हजार शेतकऱ्यांना लाभ
- वाहनाच्या दंडासाठी अभय योजनेला मंत्रिमंडळाची मंजुरी;पहिल्या वेळी दंडात २० टक्के सूट
- सैन्यदलात चार वर्षांची सेवा पूर्ण करणाऱ्या अग्निवीरांना दोन वर्ष मुदतवाढ
- न्याय्य, समृद्ध आणि शाश्वत समाजनिर्मितीत विद्यापीठांनी योगदान द्यावं-डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात राज्यपालांचं आवाहन

आणि

- पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताचा न्यूझीलंडवर पाच गडी राखून विजय

****

राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील ७३ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ५ हजार रुपयांची अग्रिम मदत जमा करण्यात आली असून, येत्या दोन दिवसात ९५ टक्के शेतकऱ्यांच्या खात्यात अग्रीम मदतीची रक्कम जमा होईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर ते आज माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजने अंतर्गत आज पुन्हा ४ लाख ८६ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात ४ हजार ७६४ कोटी रुपये जमा केल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले –

बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महायुतीचं सरकार खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभं असून विविध योजनांच्या माध्यमातून शेतकरी वर्गाला मदत केली जात असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. दरम्यान, राज्यातील सर्व मंत्री यंदा ग्रामीण भागात, शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी करणार असल्याचंही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

दरम्यान, पुण्यात चाकण इथे मर्सिडीज-बेंझच्या अत्याधुनिक इलेक्ट्रिक जीएलसी वाहनाचं लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज करण्यात आलं. महाराष्ट्राला फक्त देशाचे वाहन उत्पादन केंद्र न ठेवता भविष्यातील मोबिलिटी क्षेत्रातील जागतिक केंद्र करण्याचं उद्दिष्ट असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

****

राज्य मंत्रिमंडळाने वाहनांवरील दंडासाठी अभय योजनेला मंजुरी दिली. नियमभंग केलेल्या वाहनावरील दंडासाठी वाहतुक पोलीस चलान अभय योजना-२०२६ जाहीर केली असून, या अंतर्गत चलनावरील प्रलंबित दंडाच्या रकमेवर एकवेळची बाब म्हणून वीस टक्क्यांपर्यंत सवलत मिळणार आहे. वाहन धारकांना थकबाकी भरून वाहन दंडमुक्त करता येणार आहे.

दरम्यान, पशुवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आंतरवासिता भत्त्यामध्ये वाढ, इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गांच्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्त्यात दुपटीहून अधिक वाढ, नांदेड जिल्ह्यात मुखेड इथं वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय तसंच पालघर जिल्ह्यात तीन ग्राम न्यायालयं स्थापन करण्यास मंजूरी, वार्षिक उलाढाल पाचशे कोटींहून अधिक असलेल्या सहकारी संघिक संस्थांच्या समित्यांवर शासन नामनिर्देशित पाच सदस्यांची नियुक्ती, आदी निर्णय मंत्रिमंडळाने घेतले.

****

विविध शासकीय योजनांमध्ये महिला बचत गटांना प्राधान्य देण्याबाबत विचार करण्यात येईल, असं महिला आणि बालविकास राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितलं. आज मुंबईत यासंदर्भात झालेल्या बैठकीत त्या बोलत होत्या. महिला बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती आणि आर्थिक स्वावलंबनाला चालना देण्यासाठी माविमला अधिक संधी उपलब्ध करून देण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचं बोर्डीकर यांनी सांगितलं.

****

बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यात ऊर्ध्व कुंडलिका प्रकल्पाचे पाणी तलावांमध्ये साठवून त्याद्वारे सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देता येईल का, याची व्यवहार्यता तपासावी, असे निर्देश मंत्री मृद आणि जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिले आहेत. आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. उपलब्ध जलस्रोत, सिंचनाची गरज आणि संभाव्य लाभक्षेत्र यांचा विचार करून सर्वंकष तसंच अभ्यासपूर्ण आराखडा तयार करण्याची सूचनाही राठोड यांनी केली.

****

सर्व अग्नीवीरांना सैन्य दलात सामिल करुन घेण्यासाठीच्या योजनेला केंद्र सरकारनं मंजुरी दिली आहे. संरक्षण दल प्रमुख जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांनी नवी दिल्लीत केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर ही माहिती दिली. सध्याच्या योजनेनुसार ४ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यावर २५ टक्के अग्नीवीरांना सैन्य दलात सामील केलं जातं. उर्वरित ७५ टक्के अग्निवीरांना आता अतिरिक्त दोन वर्षांची सेवा दिली जाईल. यानंतर, सशस्त्र दलात राहू इच्छिणाऱ्या अग्निवीरांना सैन्यात भरती केलं जाईल, वाढलेल्या सेवा कालावधीमुळे अग्निवीरांना अधिक मानधनही मिळेल असंही सुब्रमणी यांनी सांगितलं.

मंत्रिमंडळाने २०२६-२७ ते २०३०-३१ या कालावधीसाठी सांख्यिकीय परिवर्तन, विश्लेषण आणि संशोधनाशी संबंधित 'विकसित भारत' उपक्रम-विस्तार योजनेला मंजुरी दिली आहे. यासाठी चार हजार ३७१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

****

आगामी मार्च अखेर राज्यात १०० टक्के कृषिपंपांना सौरऊर्जेद्वारे दिवसा वीजपुरवठा करण्यात येईल, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिलं आहे. नवी दिल्लीत भारत रिन्यूबल एनर्जी समिट अँड एक्सपो २०२६ या आंतरराष्ट्रीय परिषदेतील ते बोलत होते. महाराष्ट्रात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत १६ हजार मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प विकेंद्रीत स्वरूपात उभारण्यात येत असल्याचं लोकेश चंद्र यांनी सांगितलं.

****

विद्यापीठांनी जबाबदार नागरिक घडवण्यासोबतच न्याय्य, समृद्ध आणि शाश्वत समाजनिर्मितीत योगदान द्यावं, असं आवाहन राज्यपाल तथा कुलपती जिष्णुदेव वर्मा यांनी केलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथं डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६७ व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. या समारंभात ३३४ संशोधकांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. तसंच सुमारे ६५ हजारावर विद्यार्थ्यांना पदवी तसंच पदव्युत्तर पदव्या वितरित करण्यात आल्या. या सर्व नवपदवीधरांना राज्यपालांनी शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले –

बाईट – राज्यपाल तथा कुलपती जिष्णुदेव वर्मा

मुंबईतल्या इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे कुलगुरू प्रा. डॉ. अनिरुद्ध पंडित यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्वयंचलित तंत्रज्ञानाच्या बदलत्या युगावर पदवीधरांनी स्वार होण्याचं आवाहन, डॉ पंडित यांनी केलं.

****

गड-किल्ल्यांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासोबतच जलसंवर्धनाचं महत्त्व अधोरेखित करण्यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती आणि प्रशिक्षण प्रबोधिनी अमृत तसंच सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'अमृत दुर्गोत्सव २०२६' घेण्यात येणार आहे. १ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत नागरिकांना ऑनलाइन पद्धतीने या उपक्रमात सहभागी होता येणार आहे. 'जल है तो कल है' ही यंदाची विशेष संकल्पना आहे.

****

हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार शिवसेना उद्धव बाळासहेब ठाकरे गटाचे नेते डॉ. संतोष टारफे यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आमदार संतोष बांगर यांच्या उपस्थितीत आज हा पक्षप्रवेश सोहळा झाला. डॉ. संतोष टारफे हे आदिवासी समाजाचं नेतृत्व करत असून, त्यांच्या माध्यमातून या समाजाच्या उन्नतीसाठी अधिक व्यापक काम करण्याची संधी मिळेल, असा विश्वास शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

****

नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या हिवाळी – २०२६ पदवी परीक्षांना येत्या १७ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. या परीक्षांची प्रवेशपत्रं संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या लॉगिनवर उपलब्ध करून दिली आहेत. महाविद्यालयांनी ही प्रवेशपत्रं विद्यार्थ्यांना वेळेत वितरित करावीत, असे निर्देश परीक्षा आणि मूल्यमापन मंडळानं दिले आहेत.

****

भूमिहीन मजुरांना ३० हजार रुपये दुष्काळी अनुदान द्यावे, या मागणीसाठी भूमिहीन मजूर संघटनेच्या वतीने बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात शेकडो महिला मजुरांनी सहभाग घेतला.

****

न्युझीलंडविरुद्धचा पहिला एकदिवसीय सामना भारतानं पाच गडी राखून जिंकला. पाच सामन्यांच्या मालिकेत आज ऑकलंड इथं झालेल्या पहिल्या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून यजमान संघाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. न्यूझीलंड संघ एकेचाळीसाव्या षटकांत १८५ धावांवर सर्वबाद झाला. भारताच्या अर्शदीप सिंगनं चार तर गुरनुर ब्रारनं तीन बळी घेतले. पावसाचा व्यत्यय आल्यानं भारताला सामना जिंकण्यासाठी ३२ षटकांत १४३ धावांचं लक्ष्य देण्यात आलं. भारतानं हे लक्ष्य २३ व्या षटकांतचं पार केलं. दहा षटकांपैकी दोन षटकं निर्धाव टाकत २२ धावांत दोन बळी घेणारा अंशुल कंबोज सामनावीर ठरला. मालिकेतला दुसरा सामना येत्या शनिवारी वेलिंग्टन इथं होणार आहे.

****